महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १३३ वा | दिनांक : १८/०२/२०२५ | वार : मंगळवार

## नुसत्या तुताऱ्या फुकून काही होत नसते, राधाकृष्ण विखे पाटलांची टीका



**सांगोला :** जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नाव न घेत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष व राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. महाराष्ट्र ज्यांना जाणता राजा म्हणत होता, त्यांनी कायम दुष्काळी भागाला पाणी देणे खर्चात बसत नसल्याची उत्तरे दिली होती, अशी टीका विखे पाटील यांनी केली आहे.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या पद्धतीने दुष्काळ मुक्तीसाठी काम करत आहेत, ते पाहता नुसत्या तुताऱ्या फुकून काही होत नसते, असा टोला विखे पाटील यांनी लगावला आहे. सांगोला येथे उपसा सिंचन भूमिपूजन सोहळ्यानंतर आयोजित मेळाव्यात राधाकृष्ण विखे पाटील बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी नाव न घेत शरद पवार यांच्यावर टीका केली.

पुढे बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, सध्या राज्यात जवळपास दोन लाख कोटींचे सिंचन प्रकल्प व नदीजोड प्रकल्पाची कामे सुरू आहेत. पुढील पाच वर्षात महाराष्ट्र दुष्काळमुक्त करायचे स्वप्न आम्ही पाहत असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. तसेच यावेळी बोलताना विखे पाटील यांनी शिवसेना ठाकरे गटाचे नेते व राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील टीका केली आहे.

संजय राऊत यांच्यावर टीका करताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, संजय राऊत हे मनोरुग्ण आहेत. त्यांची जागा मेंटल हॉस्पिटलमध्ये आहे. आता त्यांच्या नेत्यांनीच ते पहावे अन्यथा जनता त्यांना जागा दाखवेल. संजय राऊत यांनी संतोष देशमुख हत्येमागे भाजप आहे का? असा सवाल उपस्थित केला होता. यावर बोलताना विखे पाटील यांनी टीका केली. विरोधकांना महायुतीने मिळविलेला विराट विजय पचनी पडला नाही. त्यामुळे कोण काय बोलते याकडे लक्ष देण्याची गरज नसल्याचे विखे पाटील यांनी म्हंटले आहे.

## बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडी जप्त

**बीड :** महाराष्ट्रात बीड जिल्ह्याची संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे सर्वत्र चर्चा सुरू आहेच, त्यात आता आणखी एका घटनेने सर्वांचे लक्ष वेधले आहे. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडीच जप्त करण्यात आली आहे. जिल्हाधिकारींची गाडी जप्त होण्याची बीडमधील ही पहिलीच घटना आहे. अविनाश पाठक असे जिल्हाधिकारींचे नाव आहे.

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील चिखल बीड येथे १९९८ साली लघु सिंचन प्रकल्प उभारण्यात आला होता. या प्रकल्पासाठी तीन शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या होत्या. त्या शेतकऱ्यांना तुटपुंजा मोबदला दिला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी याविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. १९९८ पासून संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा अद्याप मिळालाच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना ३२ लाखांची भरपाई देण्याचे आदेश माजलगाव न्यायालयाने दिले. त्यानंतर शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाही. तब्बल ९ वर्षांपासून शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत. यामुळे शेतकरी हताश झाले होते. शेतकऱ्यांनी अखेर न्यायालयात धाव घेतली आणि शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल लागला.

न्यायालयाने शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला देण्याचे अनेकवेळा आदेश दिले होते. तरी देखील कुठलीही कारवाई केली जात नव्हती. अखेर न्यायालयाने सर्व प्रकार समजून घेत जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त करण्याचे आदेश दिले. न्यायालयाने आदेश देताच जिल्हाधिकाऱ्यांची धावती गाडी म्हणजे वापरात असलेली गाडी जप्त करण्यात आली आहे. माजलगाव न्यायालयाने हा आदेश दिल्यानंतर सर्वत्र एकच खळबळ उडाली. कारण जिल्हाधिकाऱ्यांची गाडी जप्त होण्याची ही बीड जिल्ह्यातील पहिलीच घटना आहे.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची गाडी जप्त करण्यात आली आहे. आता न्यायालय काही दिवस पैसे जमा होण्याची वाट बघेल. त्यानंतरही पैसे जमा नाही झाले तर जिल्हाधिकाऱ्यांच्या गाडीचा लिलाव करण्याचे आदेश न्यायालय देऊ शकते, असे वकिलांनी सांगितले आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

## एकनाथ शिंदेंच्या आमदारांच्या सुरक्षेत कपात, आता केवळ एकच सुरक्षारक्षक असणार

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात नाराजीच्या चर्चा सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांच्या नेत्यांच्या सुरक्षेत कपात केल्याची माहिती समोर आली आहे. शिवसेनेच्या आमदारांना व नेत्यांना वाय दर्जाची सुरक्षा होती. मात्र आता त्यात कपात केल्याने शिवसेनेच्या नेत्यांनी संताप व्यक्त केला आहे. शिवसेनेसोबतच राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या काही नेत्यांची देखील सुरक्षा कमी करण्यात आली असल्याचे समजते.

राज्यातील व्हीआयपी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला असून ज्या नेत्यांच्या जीवाला धोका नाही त्यांच्या सुरक्षेमध्ये कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये भाजप, राष्ट्रवादीसह शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्यांचा समावेश आहे. भाजप नेते रवींद्र चव्हाण, प्रताप चिखलीकर यांच्यासह अनेक नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

पूर्वी वाय दर्जाची सुरक्षा असताना आमदारांच्या पुढे-मागे पोलिसांच्या गाड्या असायच्या तसेच आमदारांच्या घराबाहेर देखील पोलिस तैनात असायचे. मात्र आता यात कपात करण्यात येणार आहे. नवीन नियमानुसार, शिंदेंच्या आमदारांच्या मागे पुढे असणाऱ्या पोलिसांच्या गाड्या कमी करण्यात आल्या आहेत. तसेच घराबाहेरील पोलिसांची संख्या देखील कमी करण्यात येणार आहे.

राज्य सरकारच्या या नवीन नियमानुसार, शिंदेंच्या आमदारांना आता एकच सुरक्षा रक्षक असणार आहे. या निर्णयामुळे शिंदेंच्या आमदारांनी नाराजी व्यक्त केली आहे. पूर्वी ताफा घेऊन फिरणाऱ्या आमदारांना आता केवळ एक सुरक्षारक्षकासह फिरावे लागणार आहे. गृहखात्याच्या या निर्णयावर शिंदे गटाच्या आमदारांनी नाराजी व्यक्त केली आहे.

शिवसेना फुटल्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले आणि त्यानंतर त्यांनी शिवसेना आमदारांच्या सुरक्षेत वाढ केली. शिंदेंसोबत आलेल्या आमदारांना त्यावेळी वाय दर्जाची सुरक्षा देण्यात आली. यावरून अनेकदा सरकारवर आक्षेप घेण्यात आले होते. पण अडीच वर्षांच्या काळात ती सुरक्षा कायम ठेवण्यात आली होती. मात्र, आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री बनल्यावर सुरक्षेत कपात करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ फेब्रुवारी २०२५


## कलेमध्येच जीवनाचा आनंद, सामर्थ्य व सौंदर्य - संजयकुमार चव्हाण यांचे प्रतिपादन







**मंठा :** मंठा शहरातील अशोका पब्लिक स्कूल व छत्रपती संभाजी राजे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चे 'नृत्यरंजन 'वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पालक मंठा शहराच्या नगराध्यक्ष वंदना वैजनाथ बोराडे, पालक प्रतिनिधी दत्ता रामपूरकर, नंदकिशोर जाधव उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अशोक भाऊ चव्हाण सेवा संस्थेचे संस्थापक संचालक संजयकुमार चव्हाण होते.

नृत्यरंजन सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली तर राज्य गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध कलाकृतींचे बहरदार सादरीकरण केले. सण उत्सवा सोबतच मंचावर लावणी भारुड गोंधळ महाराष्ट्राची लोकधारा व लोककला सादर करण्यात आल्या.

अध्यक्षीय भाषणात चव्हाण म्हणाले"चौसष्ट कलेमध्ये च जीवनाचा आनंद, सामर्थ्य व खरे सौंदर्य*आहे. अशोका स्कूलने कधीही गुणवत्तेची तडजोड केली नाही. गुणवान शिक्षकामुळे संस्थेचा नावलौकिक निर्माण झालेला आहे. यामध्ये सर्वांचा सिंहाचा वाटा आहे." असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष संजयकुमार चव्हाण यांनी केले.

एकदंता, वेलकम, डिगी डिगी, काली महाकाली,चिल चिल चिल्ला के, जयस्तु जयस्तु भारतम, धक धक धरती,स्कूल नही जाना है अशा विविध गाण्याने सर्वांचे लक्ष वेधले. पास नही तो फेल, पार्टी तो बनती है, पुष्पा, मजे मजेची शाळा, योद्धा बन गई, बुमरो बुमरो, अंबाबाईचा गोंधळ, पंजाबी मॅशअप, हम दीप शिक्षा के है, बिहू डान्स अशा विविध कला प्रकारात वर विद्यार्थ्यांनी ठेका धरला होता. बाल नाट्य शिवबाच नाव, नाच ग बया सह सोशल मीडियाचा ड्रामा याद्वारे सर्व प्रेक्षकांना मंत्रमुग्ध विद्यार्थ्यांनी कलागुणातून केले. त्यामुळे उपस्थित रसिकांनी भरघोस बक्षिसाची पावती ही या विद्यार्थ्यांना दिली. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तब्बल चार तास चाललेल्या या कार्यक्रमांमध्ये शेवटपर्यंत प्रेक्षक जागेवर खेळून बसले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आदिवासी ठरते ऑनलाइन नाटिका राष्ट्रभक्तीपर गीते फिल्मी गीते लोकगीते रिमिक्स गीते सादर करून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक वृंद अलका देशमुख,वंदना मोरे, रेखा चिंचोले, इर्शाद पठाण, प्रियंका चिंचने, प्राजक्ता कुलकर्णी, गणेश वायशे, राधिका जोशी, आरती कुलकर्णी, कांचन एखांडे, अनंत निर्वळ, स्वाती हिवाळे, धनश्री कापडे, सविता राठोड, प्रणिता दळवी, शिवाजी काळे ,ज्योती शहाणे , केशव खणके, श्याम देशमुख आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रेणुका विसपुते यांनी तर आभार प्रदर्शन अनिल निर्वळ यांनी केले.

## कृषीभूषण डॉ. सिताराम जाधव सेवारत्न पुरस्काराने सन्मानित



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड येथील समाजसेवी कृषिभुषण डॉ. सिताराम जाधव यांनी सेवारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दि. १७ फेब्रुवारी रोजी पोहरादेवी जि. यवतमाळ येथे संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त बंजारा समाजाचे थोर साधु संत महंत व समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच कॅबिनेटमंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रजीत नाईक, आमदार धर्मगुरू बाबुसिंग महाराज, माजी खासदार हरिभाऊ राठोड समाजातील पारंपारिक वेश भूषण प्रदान करून महिला मंडळ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या. पोरा देवी इथे दरवर्षी सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त या ठिकाणी बंजारा समाजाचे समाज बांधव मोठ्या प्रमाणावर एकत्र येतात.या वर्षी समाजाचे वतीने आगळा वेगळा कार्यक्रम पोहरादेवी इथं संपन्न झाला समाजामध्ये अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या समाजबांधव सत्कार करण्यात आला आणि यामध्ये क्रीडा कृषी शैक्षणिक धार्मिक सामाजिक वैद्यकीय राजकीय मध्ये काम करणाऱ्या लोकांचा गौरव करण्यात आला. समाजाचे ज्येष्ठ कन्नड येथील डॉक्टर सिताराम जाधव वैद्यकीय सेवा करीत असतानाच कृषी मध्ये आपलं नाव लौकिक केलं समाजाला कायमस्वरूपी कॅन्सर मुक्त ठेवण्या साठी अंबाडी धरणाजवळ स्वत:च्या शेतात सेंद्रिय शेती चॉकलेट चालू करून आज संपूर्ण जवळपास ७५ एकर वर सेंद्रिय शेती करीत आहे रसायनमुक्त शेती हे तत्व त्यांनी पाण्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या वतीने नेमकं असल्यामुळे कृषी भूषण पुरस्कारही देऊन गौरव करण्यात आले होते. याच अनुषंगाने समाजाच्या वतीने आज डॉ सिताराम जाधव यांना कृषी मध्ये सेवा रत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.या प्रसंगी कॅबिनेट मंत्री संजय राठोड, आमदार धर्मगुरू बाबुसिंग महाराज, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी खासदार हरिभाऊ राठोड, आमदार राजेश राठोड, आमदार सईताई डहाके, डॉ रविराज जाधव, जीवन दादा पाटील सेवानिवृत्त नायब तहसीलदार शिवलाल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते एकनाथ चव्हाण, समाजसेवक विठ्ठल चव्हाण आदी उपस्थित होते.

## नागसेन फेस्टीव्हल जल्लोष भीमजयंतीचा, महोत्सव विचारांचा




**छत्रपती संभाजीनगर :** पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या आजी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने भीमजयंती निमित्त मागील ९ वर्षांपासून आयोजित करण्यात येणाऱ्या नागसेन फेस्टिव्हल २०२५ ची महत्वपूर्ण बैठक काल डॉ.आंबेडकर विधी महाविद्यालय, नागसेनवन येथे संपन्न झाली. दि. २८,२९ आणि ३० मार्च २०२५ ह्या तारखा जाहीर करण्यात येऊन अनेक दर्जेदार वक्ते, कवी, प्रमुख पाहुणे यांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. पुढील बैठकीत ती जाहीर करण्यात येणार आहेत.मिलिंद नागसेनवन स्टुडंन्ट्स वेल्फेअर असोसिएशन


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फिल-पी.एच.डी., थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ फेब्रुवारी २०२५


## गड किल्ल्यांच्या सानिध्यात मिशन ५०० सह्याद्री शिवजन्मोत्सवास सुरुवात



**कन्नड (अरुण थोरात) :** मिशन ५०० कोटी लीटर जलसाठा अंतर्गत शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ हा आपल्या परिसरातील जंगल, इतिहास समजून घेत व संवर्धन करुन साजरा करण्यात यावा. यासाठी पाटणादेवी ता.चाळीसगाव परिसरात कन्हेरगड किल्ला, मद्रासी बाबा परिसरात दि.१६ फेब्रुवारी रोजी जंगल सफारी आयोजित करण्यात आली होती.उपक्रम संकल्पना उज्वलकुमार चव्हाण संकल्पक मिशन ५०० कोटी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणूनदिलीप घोरपडे मा. अध्यक्ष सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान आदी भल्या पहाटे सर्व अभ्यासक मोठ्या संख्येने हेमांडपंथी महादेव मंदिराजवळ जमले. महिला व तरुण मुलांची संख्या जास्त होती. आपल्या परिसरातील वस्तू व वास्तूंचा अभ्यास करुन जतन व संवर्धन करत शिवजयंती साजरी करण्यात यावी. ती खरी शिवजयंती साजरी केल्यासारखं होईल. असा मोहिमेचा उद्देश असल्याचे डॉ.उज्वलकुमार चव्हाण यांनी याप्रसंगी सांगितले. दुर्ग संवर्धनासाठी महाराष्ट्रभर सह्याद्री प्रतिष्ठान करत असलेल्या कामांची माहिती मोहिमेचे अध्यक्ष दिलीप घोरपडे यांनी दिली. आठ वाजता सर्वांनी हेमाडपंती महादेव मंदिरा जवळून किल्ल्याकडे जाणाऱ्या पायवाटेने चढाईला सुरुवात केली. वातावरणात सकाळी थोडी थंडी होती पण चढाईला सुरुवात झाली तेव्हा थंडी कुठल्याकुठे पळून गेली. थोड्या चढाई नंतर येणारी जैन लेणी पाहून शृंगार चावडी कडे प्रस्थान केले. जंगलामध्ये आपण खुप शांतता ठेवली पाहिजे. शृंगार चावडीच्या परिसरात अशीच शांतता ठेवत आम्ही डॉ. उज्वलकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शन घेतले. शृंगार चावडीच्या लेणीमध्ये दगडांवर सुंदर कोरीव काम आढळते. शृंगार चावडी पाहून कन्हेरगडाच्या माथ्याकडे प्रस्थान केले. कन्हेरगडाचा माथा चढत असताना कातळ खडकामध्ये सह्याद्री प्रतिष्ठानने कोरलेल्या पाय-यांमुळे सर्वांची चढाई सोपी झाली. माथ्यावर दगडी बुरुजाजवळ थोडी विश्रांती घेतली. त्या ठिकाणी किल्ले कन्हेरगडाला 'कन्हेरगड'हे नाव कसं पडलं असावं? याविषयी विचार मंथन झालं, बुरुज पाहून कन्हेरगडावरील अतिशय उंचावरचे आणि शेवटचे टोक म्हणजे 'हनुमान टेकडी' या भागाला भेट देऊन मद्रासी बाबाकडे जाणाऱ्या पायवटेने निवडक दुर्गसेवकांनी प्रस्थान केले. मद्रासीबाबा कडे जाणाऱ्या रस्त्यावर भर उन्हात आम्ही जंगल तुडवत होतो. पूर्ण जंगल वाळलेलं होतं. गवत वाढलेलं होतं. डोक्यावर ऊन मी म्हणत होतं. पुढे गेल्यावर आम्हाला खूप सागाची झाडं दिसली. त्या खालून जातांना पानांवर पाय पडल्यामुळे चुरचुर आवाज येत होता. भाजलेला पापड मोडतांना होतो तसा. जंगलामध्ये सगळी झाडं वाळलेली असताना एका झाडाला मात्र पिवळी धम्मक सुंदर फुलं आलेली दिसली. विपरीत परिस्थितीतही एखाद्या व्यक्तीनं सुखी -समाधानी असावं असं मला ते फुलांचं झाडं भासलं.

इकडे कन्हेरगडावरून पायथ्याला आलेली मिशन ५०० ची टीम आणि सह्याद्रीचे काही दुर्गसेवक यांनी हेमाडपथी महादेव मंदिराजवळ थांबून पूर्ण जंगल सफारीचा थकवा घालवला आणि हास्य विनोद गप्पागोष्टी करत भोजनाचा आनंद घेतला. त्यानंतर डॉक्टर उज्वल कुमार चव्हाण यांनी उपस्थितांमधून काही सदस्यांना आपापले अनुभव कथन करायला सांगितले यात महाविद्यालयीन विद्यार्थी प्राध्यापक शिक्षिका तसेच सह्याद्री प्रतिष्ठानचे श्री घोरपडे यांनी या भटकंतीमध्ये आलेले अनुभव तसेच काही सूचना या ठिकाणी मांडल्यात आणि आता इथून पुढे येणाऱ्या प्रत्येक शिवजयंतीला अशाच पद्धतीने एखाद्या किल्ल्यावर जाऊन त्याच्या सानिध्यात शिवजन्मोत्सव साजरा करण्याचा निर्धार सर्वांनी केला व परिसरात सर्वांनी निरव शांततेच्या सहवासात पसायदानाने या स्थळाचा निरोप घेतला.

## खाद्यपदार्थ निर्मितीस व्यवसायाची जोड देऊन आत्मनिर्भर बना - मेघा पतंगे



**छत्रपती संभाजीनगर : (शिवाजी गायकवाड)** मौजे करोडी , तालुका छत्रपती संभाजीनगर येथे कृषी विभागामार्फत राज्यस्तरीय सामूहिक फळ प्रक्रिया व संस्करण प्रशिक्षण केंद्र छत्रपती संभाजी नगर अंतर्गत फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

कृषी सहाय्यक ज्योती चितळकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून प्रशिक्षणास सुरुवात झाली. तज्ञ प्रशिक्षक राजेंद्र यादव, कृषी पर्यवेक्षक गायत्री कातोरे यांनी जॅम, जेली, सरबते, टोमॅटो केचप, पपई सॉस, लोणचे, चटण्या यांसारख्या पदार्थांच्या रेसिपीज खेळीमेळीच्या वातावरणात प्रत्यक्ष करून दाखवत माहितीपूर्ण टिप्सही सांगितल्या.

तंत्र अधिकारी मेघा पतंगे यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व सांगत महिलांनी स्वयं पारंगत खाद्यपदार्थ निर्मितीला व्यवसायाची जोड द्यावी. त्यासाठी केंद्र शासनाच्या पीएमएफएमइ अंतर्गत वैयक्तिक व्यवसाय उभारणीसाठी एकूण खर्चाच्या ३५ टक्के अनुदानाचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले. डीआरपी सहाय्यक रमेश भवर तसेच कृषी सहाय्यक रंगनाथ पिसाळ यांनी प्रधानमंत्री कृषी सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजना विषयी माहिती देताना यामध्ये अंतर्भूत कृषी व्यवसाय, पात्रता, अटी शर्ती ,अर्ज प्रक्रिया ,बँक कर्ज प्रक्रिया ,मिळणारे अनुदान यांविषयी सविस्तर माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी, छत्रपती संभाजीनगर मेघशाम गुळवे यांनी करोडी गावात औद्योगिक क्षेत्रात वाढ होत असल्याकारणाने कृषी प्रक्रिया व्यवसायास मोठा वाव आहे. यासाठी गट निर्माण करून गटांमार्फत कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करावेत. त्यासाठी प्रधानमंत्री कृषी सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, AIF अंतर्गत जास्तीत जास्त गट पुढे येतील अशी आशा व्यक्त केली.

कार्यक्रमास सरपंच सुनीता गवांदे, उपसरपंच सोमीनाथ नवले, सर्जेराव चव्हाण, देविदास गवांदे, विजय जाधव ,ग्रामपंचायत सदस्य सिंधुबाई कडूबाळ गडगूळ, महिला बचत गट सीआरएफ नीता गायकवाड, लता अरुण जाधव, पूजा गडगूळ, राधा जाधव, शिल्पा भालेकर, शुभांगी नवले, प्रियंका जाधव, पोलीस पाटील चंद्रकांत जाधव,कृषी मित्र दादापाटील गडगूळ, ग्रामपंचायत कर्मचारी रमेश नवले व इतर सर्वजण मोठ्या संख्येने उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ फेब्रुवारी २०२५

## राष्ट्रीय पँथर्स आघाडी कामगार संघटनेच्या वतीने मनपा ठेकेदार आणि सफाई कर्मचाऱ्यांची बैठक संपन्न



**मुंबई (प्रतिनिधी) :** दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी कामगार संघटनेचे सर्वेसर्वा अविश राऊत यांनी मनपा ठेकेदार व सफाई कामगार यांची संयुक्त बैठक आयोजित करून कामगारांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच मनपा ठेकेदार व सफाई कामगार यांच्यात सखोल निर्माण करून भविष्यात एकत्रितपणे काम करण्याचे आश्वासन घेण्यात आले.

राष्ट्रीय पँथर्स आघाडीच्या कामगार संघटनेकडे दहिसर पश्चिमेला मुंबई मनपा मध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना बेकायदेशीरपणे कामावरून काढून टाकून अन्याय केले असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सतरा अठरा वर्षापासून काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होऊन सफाई कामगारांनी आंदोलनाची भूमिका घेतली होती.

दरम्यान राष्ट्रीय पँथर्स आघाडीचे संतोषजी कांबळे, लक्ष्मण रखमे, जीभाऊ अहिरे यांनी मनपाचे वरिष्ठ अधिकारी तसेच संजीवनी एस श्री या कंपनीचे सर्वेसर्वा यांच्याशी प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर चर्चा करून कामगारांना दिल्या जाणाऱ्या त्याच वेतन प्रमाणे व सर्व सुविधांसह पुन्हा कामावर निरंतर ठेवण्याचे लिखित आश्वासन घेतले होते.तसेच कंपनी आणि सफाई कामगार यांच्यात लिखित करार करण्यात येणार असल्याचे निर्णय आप आपसात चर्चा करून घेण्यात आले होते.

त्या अनुषंगाने दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी कामगार संघटनेच्या वतीने मनपा ठेकेदार कंपनीचे मालक गोपाल जी रायथथा आणि सफाई कामगारांच्या प्रमुख लीडर बिजला कापुरे, गीता अहिरे तसेच महिला सफाई कामगार यांच्या सोबत संयुक्तरीत्या बैठकीचे आयोजन करण्यात येऊन, सदर बैठकीत सफाई कामगार आणि कंपनी व्यवस्थापन यांच्या समस्या जाणून घेऊन प्रत्येक समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात येऊन सर्व समस्या सोडवण्यात आल्या. यावेळी कामगारांनी तसेच मनपा ठेकदार यांनी संघटनेचे आभार मानले.

## डॉ. वसंत राठोड यांचा विद्यापीठात सत्कार



**नांदेड :** महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी दरवर्षी 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार' दिले जातात. यावर्षी आत्मचरित्र या साहित्य प्रकारात 'लक्ष्मीबाई टिळक साहित्य पुरस्कार' किनवट येथील लेखक आणि कार्यकर्ते डॉ. वसंत भा. राठोड यांच्या 'कल्लोळ' या आत्मचरित्रास जाहीर झाला आहे.या यशाबद्दल डॉ. राठोड यांचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने संचालक डॉ. पी. विठ्ठल यांच्याहस्ते नुकताच सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार, प्राचार्य डॉ. आनंद भंडारे, डॉ.सुनील व्यवहारे, डॉ. वैजनाथ अनमुलवाड, काळबा हनवते यांची उपस्थिती होती. डॉ. राठोड हे मागील सत्तावीस वर्षापासून अध्यापन कार्य करत आहेत. गोरबंजारा, भटके, दलित, आदिवासी यांच्या चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतलेला आहे.

## आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी आरोग्य विद्यापीठाचा संघ रवाना




**नाशिक :** खेळांमुळे आत्मविश्वास, सांघिक भावना वाढते असे प्रतिपादन विद्यापीठाच्या मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकरा। (निवृत्त) प.वि.से.प.. अ.वि.से.प वि.से.प यांनी केले. या वर्षीचा आंतरविद्यापीठ "क्रीडा महोत्सव-२०२४" गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठ येथे संपन्न होणार आहे. याकरीता सहभागी होणाÚया खेळाडूच्या पुर्वतयारीसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरला माधुरी कानिटकर (निवृत्त) समवेत लेफ्टनंट जनरल डॉ. राजीव कानिटकर (निवृत्त), कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू. विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील, उपकुलसचिव डॉ. सुनिल फुगारे, उपकुलसचिव श्री. एन. व्ही. कळसकर, विधी अधिकारी अॅड. संदीप कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे, सहाय्यक कुलसचिव श्री. संदीप राठोड, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता श्री. बाळासाहेब पेंढारकर आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) यांनी सांगितले की. व्यक्तिमत्व विकासात विविध प्रकाराच्या खेळांचा महत्वपूर्ण सहभाग • असणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात एकतरी खेळामध्ये सातत्यपूर्ण सराव ठेवावा त्यामुळे शारीरिक व मानसिक आरोग्या निरोगी राहते तसेच खेळामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.निर्णयक्षमता, सहानुभूती, शिस्त आणि सहकार्याची भावना निर्माण होते आणिग्या गुणांच्या बळावर व्यक्ती कोणतेही कार्य करण्यास सक्षम होतो. विद्यापीठतर्फे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रमात राबविण्यात येतात. जेणेकरुन विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळेल असे त्यांनी सांगितले. यावेळी कीडा महोत्सवात सहभागी होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी एक्रीडाज्योतीचे प्रज्वलन करुन संपूर्ण विद्यापीठ परिसरामध्ये फेरी काढली तसेच मा. कुलगुरु महोदया यांना मानवंदना देऊन क्रीडा महोत्सवाकरीता प्रस्थान केले. याप्रसंगी मा. कुलगुरु महोदयांनी सर्व विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी केले. आंतरविद्यापीठ "क्रीडा महोत्सव-२०२४" सराव शिबिर यशस्वीरित्या पारा पडण्याकरिता विद्यापीठातील श्री. समाधान जाधव, श्री. अविनाश सोनवणे. श्री. सुरेश पुजारी श्री. अर्जुन नागलोत, श्रीमती मानसी हिरे, श्री. घनश्याम धनगर, श्री. राजेंद्र दिवे, श्रीमती वासंती चौधरी आदी कर्मचाÚयांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ फेब्रुवारी २०२५



## भावस्पंदन काव्य संग्रहाचे प्रकाशन थाटात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** कवयित्री मृणाल देशपांडे लिखित भावस्पंदन काव्यसंग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध गीतकार, कवी मा. प्रविण दवणे ह्यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. प्रवीण दवणे ह्यांनी भूषविले. प्रमुख पाहुण्या म्हणून लेखिका, अनुवादक मा. डॉ. रमा गर्गे उपस्थित होत्या. यावेळी वल्लरी प्रकाशनचे श्री व्यंकटेश कल्याणकर ह्यांची प्रमुख उपस्थिती होती. काव्यसंग्रहावर भाष्य करताना मा. प्रविण दवणे म्हणाले मृणाल देशपांडे ह्यांच्या कवितेत बोरकरांसारखी जादू आहे.त्यांची कविता वाचकांना आंतर्मुख करते, मनाचा ठाव घेते असे मृणाल ह्यांचे लेखन मराठी साहित्याच्या वैभवात भर घालणारे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

श्रीमती पूजा कावरे ह्यांनी सरस्वती स्तवन सादर केले. श्री महेश अचींतलवार ह्यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. गझलकार गिरीश जोशी ह्यांनी आभार व्यक्त केले. यावेळी सभागृहात सुप्रसिद्ध कवी प्रा. डॉ. दासू वैद्य, डॉ संदीप शिसोदे, अँड. प्रीती डिग्गीकर, तृप्ती डिग्गीकर, डॉ. कुलकर्णी, कवयित्री रसिका देशमुख, प्रिया धारूरकर, रंजन कंधारकर, माधुरी चौधरी, कस्तुरी कुलकर्णी,संध्या फुलपगार, भास्कर निर्मळ पाटील, सुनील उबाळे, द्वारकानाथ जोशी इत्यादी साहित्यिक मान्यवरांसह नातलग ,स्नेही आणि प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री सिद्धार्थ देशपांडे, मधुरा रांगे, मिहिर देशपांडे, चिन्मयी देशपांडे, श्रेया राहुरी, चेतना भालेराव, माधवी राहुरी, क्षमा मोहिनी, इत्यादींनी परिश्रम घेतले.

## पुण्यात वैद्यकीय साहित्य संमेलनाचे आयोजन



**पुणे :** सिंहगड रोड डॉक्टर्स असोसिएशन साहित्य कट्टातर्फे एस.एम.जोशी सभागृहात 'डॉक्टरांची वारी, संमेलनाच्या दारी' या अखिल महाराष्ट्र वैद्यकीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रसिद्ध कवी संदीप खरे यांनी कवितेविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले.

खरे यांनी सांगितले की, कविता हा सर्वोच्च साहित्य प्रकार असून ती आपल्याला नेहमीच्या गुरुत्वाकर्षणापासून दूर ठेवते. कविता लिहिणे, वाचणे आणि ऐकणे यासाठी माणसाने थोडे वेडे असणे आवश्यक आहे. त्यांनी कवितेच्या माध्यमातून कवी, वाचक आणि रसिक स्वतःची परीक्षा करत असल्याचेही नमूद केले.

संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. कल्पना भांगे होत्या, तर स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. विद्युलता दोशी यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमात द नेचर समुहाचे चेअरमन सुशिलकुमार देशमुख, पुण्यभूषण संस्थेचे संस्थापक डॉ. सतीश देसाई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान संदीप खरे यांनी "कधीतरी वेड्यागत वागायला हवे" आणि "मन तळ्यात मळ्यात" या कविता सादर केल्या, ज्यांना उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली. या निमित्ताने आयोजित केलेल्या ग्रंथदिंडी आणि पुस्तक प्रदर्शनाचेही उद्घाटन करण्यात आले. डॉ. संपदा जोशी, डॉ. नीरज जाधव आणि डॉ. जीवन आटोळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर कवी संमेलनाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. मनीषा भोसले यांनी केले.

# मनोज जरांगेंचे महत्त्व कमी करण्यासाठी सुरेश धसांचा वापर - जितेंद्र आव्हाड यांचा दावा



**ठाणे :** बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडवर गुन्हा दाखल झाल्यानंतर भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात चांगलीच आक्रमकता दाखवली आहे. मात्र सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याने सुरेश धस यांची विश्वासार्हता राहिली नसल्याची टीका केली जात आहे. तसेच मनोज जरांगे यांचे महत्त्व कमी करण्यासाठी सुरेश धस यांचा वापर करण्यात आला, अशी टीका राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

माध्यमांशी संवाद साधताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, मनोज जरांगे पाटील यांचे महत्त्व कमी करण्यासाठी आमदार सुरेश धस यांचा वापर झाला. सुरेश धस चांगले वक्ते आहेत. एका जनसमुदायाला ते खिळवून ठेवू शकतात. लोकांना मोहीत करण्याची कला त्यांना अवगत आहेत. ती कला मनोज जरांगे यांच्याकडे नाही. जरांगे पाटील यांच्याकडे कमिटमेंट आहे. जरांगे पाटील यांच्या चेहऱ्यावर समाजाप्रती असलेली प्रामाणिक भावना दिसते. या सगळ्याला छेद देण्यासाठी सुरेश धस यांचा वापर करण्यात आला, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड यांनी सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्यात साडेचार तास झालेल्या भेटीवर देखील टीका केली आहे. धनंजय मुंडे यांना तुम्ही शत्रू मानत होतात आणि त्याच शत्रूसोबत साडेचार तास चर्चा करता. यातच तुमच्या युद्धातली सगळी दाहकता, तीव्रता संपते, अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. सुरेश धस आणि धनंजय मुंडे हे साडेचार तास चर्चा करतात हे खटकणारे आहे, असेही आव्हाड म्हणाले.

मला धनंजय मुंडे रस्त्यावर भेटले तरी मी त्यांना बोलेन. पण साडेचार तास चर्चा केल्यानंतर लोक संशयाने बघणार. जो माणूस त्या व्यक्तीवर आरोप करतो तो माणूस साडेचार तास भेटतो हे अनाकलनीय आहे. साडेचार तास भेटतात तेव्हा बीडच्या वातावरणावर बोलता का? चर्चा टू द पॉईंट झाली असेल, असेही जितेंद्र आव्हाड म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जेव्हा आरोप केले जात होते तेव्हा मी राजीनामा दिला असल्याचे विधान पवारांनी केले होते. यावर बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, अजित पवार जे बोलतात ते खरे आहे. त्यांच्यावर जेव्हा आरोप झाले होते तेव्हा त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला होता. तेव्हा बहुसंख्य आमदारांनी त्यांना सांगितले होते की तुम्ही राजीनामा देऊ नका. महाराष्ट्राची परंपरा आहे जेव्हा मोठे आरोप होतात आणि ज्यावेळी चौकशी लागते तेव्हा ती व्यक्ती सत्तेच्या वर्तुळातून बाहेर पडते. सत्तेच्या सोबत राहिलेल्या त्या माणसाला पोलिसांचा अभय मिळते. अजित पवारने त्यावेळी घेतला निर्णय योग्य होता.